# जाहिरात

## पुणे जिल्हा परिषद, पुणे
## सामान्य प्रशासन विभाग (विधी कक्ष)

पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच क्षेत्रीय स्तरावरील प्रलंबित असलेल्या व नव्याने दाखल होणाऱ्या विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये पुणे जिल्हा परिषदेची बाजू विविध स्तरावरील (मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मा. जिल्हा न्यायालय, मा. कामगार व औद्योगिक न्यायालय, मा. तालुका स्तरीय न्यायालय इ.) न्यायालयांमध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांच्या कायदे विषयक बाबींबाबत कायदेशीर सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणांच्या न्यायालयीन कामकाजाकरिता ॲडव्होकेट पॅनल वर खालील प्रमाणे विधी तज्ज्ञांची करार पध्दतीने मानधनावर नियुक्ती करावयाची आहे. त्याकरीता ॲडव्होकेट पॅनलवर खालील प्रमाणे वकिलांच्या नियुक्तीसाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून पुणे जिल्हा परिषदेच्या **www.zppune.org** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म दवारे अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | अर्जदारासाठी आवश्यक अनुभव |
|---|---|---|
| 1 | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | मा. सर्वोच्च न्यायालयात 10 वर्षे |
| 2 | मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ | मा. उच्च न्यायालयात 10 वर्षे |
| 3 | मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ | मा. उच्च न्यायालयात 10 वर्षे |
| 4 | मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ | मा. उच्च न्यायालयात 10 वर्षे |
| 5 | मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण | मा. मॅट न्यायालयात 10 वर्षे |
| 6 | मा. जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे (वरिष्ठ / कनिष्ठ स्तर) | मा. जिल्हा न्यायालयात 15 वर्षे |
| 7 | मा. कामगार / औद्योगिक न्यायालय, स्वारगेट, पुणे | मा. कामगार न्यायालयात 15 वर्षे |
| 8 | तालुका स्तरीय न्यायालय (आंबेगांव / बारामती / भोर / दौंड / इंदापूर / जुन्नर / खेड / मावळ / पुरंदर / शिरुर ) (प्रत्येकी स्थानिक 2) | मा. तालुका स्तरीय न्यायालयात 15 वर्षे |
| 9 | मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर बारामती, राजगुरुनगर व मावळ (प्रत्येकी 1) | मा. जिल्हा व सत्र न्यायालयात 15 वर्षे |

**<u>जिल्हा परिषदेच्या विधी पॅनलवरल वकीलांची नियुक्ती करणेकामी उमेदवारांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u>.**

1) अर्जदार हा भारताचा नागरिक असावा.
2) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेली असावी.
3) अर्ज सादर करावयाच्या अंतीम दिनांकास अर्जदाराचे वय किमान 33 वर्षे पूर्ण असावे.

Scanned with CamScanner

4) अर्जदार यांनी वकिली व्यवसायाची सनद धारण केलेली असावी.

5) अर्जदाराचा वकिली व्यवसायाचा वरिल तक्त्याप्रमाणे अनुभव आवश्यक राहील.

6) अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

7) जिल्हा परिषद पॅनलवर यापूर्वी काम केलेल्या वकीलांनी नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक असून त्यांचेकडे यापूर्वी सोपविण्यांत आलेल्या न्यायालयीन प्रकरणांचे निकाल जिल्हा परिषदेच्या बाजूने किती प्रमाणामध्ये झालेले आहेत याबाबतचा सविस्तर तपशिल अर्जासोबत सादर करावा.

8) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यायालय निहाय वकिलांची नेमणूक करावयाची असल्याने इच्छूक अर्जदारांनी ज्या ठिकाणी काम करण्यास इच्छूक आहे त्याप्रमाणे न्यायालय निहाय स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तथापि एकापेक्षा अधिक न्यायालयासाठी निवड केली जाणार नाही.

9) अर्जदारास महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958, महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1982, सेवा विषयक बाबी, विभागीय खातेनिहाय चौकशी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964, वर्तणूक नियम 1967, प्रशासकीय कामकाज पध्दती, महसूल विषयक बाबी, फौजदारी व दिवाणी प्रकिया संहिता इ. चे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

10) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी विहित केलेल्या नमुन्यात करारपत्र (Agreement) करुन देणे बंधनकारक राहील.

**<u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे</u> :-**

1) विहित नमुन्यातील अर्ज व अर्जासोबत विहित केलेले प्रतिज्ञापत्र.

2) शैक्षणिक अर्हते संदर्भात सर्व गुणपत्रक व प्रमाणपत्र, विधी शाखेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, बार कौन्सिलचे प्रमाणपत्र (सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात)

3) वयाच्या पुराव्याकरिता जन्म दाखला अथवा माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अगर समकक्ष पुरावा.

4) न्यायालयामध्ये दावे चालविण्याचा विहित अनुभव असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

5) अर्जदाराने त्यांचे अनुभवा बाबतचे स्व-साक्षांकनाचे घोषणापत्र सादर करावे.

**<u>निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया</u> :-**

1) प्राप्त अर्जांची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची यादी पुणे जिल्हा परिषदेच्या **www.zppune.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

2) अर्जदारांची निवड ही मुलाखतीदवारे करण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने मुलाखत आयोजित करावयाची झाल्यांस त्याबाबत मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना त्यांनी नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर यशावकाश कळविण्यांत येईल.

Scanned with CamScanner

3) ऑनलाईन / ऑफलाईन मुलाखतीस जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारांचा पुनःश्च मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

4) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

5) अर्जदार यांना मुलाखतीस येताना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

6) ॲडव्होकेट पॅनल निवडीसाठी गठीत केलेल्या समिती मार्फत मुलाखतीदवारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडी बाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.

7) ॲडव्होकेट पॅनलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे / तहकूब करणे / रदद करण्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे राखीव राहतील.

**<u>वकील फी चे दर व त्याबाबतचे निकष</u> :-**

**ॲडव्होकेट पॅनल वरील निवड केलेल्या वकिलांना खालीलप्रमाणे वकिल फी अनुज्ञेय राहील.**

| अ. क्र. | न्यायालय | वकील फी (प्रति दावा) | इतर खर्च (प्रति दावा) | एकूण फी (प्रति दावा) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | 65000 | 15000 | 80000 | दाव्याच्या अनुषंगाने वकीलपत्र व जि. प. चे म्हणणे सादर केल्यानंतर 50% व अंतीम निकालानंतर निकालाची प्रमाणित सत्यप्रत सादर केल्यानंतर ऊर्वरित 50% |
| 2 | मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ | 20000 | 5000 | 25000 | |
| 3 | मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ | 20000 | 5000 | 25000 | |
| 4 | मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ | 20000 | 5000 | 25000 | |
| 5 | मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण | 20000 | 5000 | 25000 | |
| 6 | मा. जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे (वरिष्ठ / कनिष्ठ स्तर) | 15000 | 3000 | 18000 | |
| 7 | मा. कामगार / औद्योगिक न्यायालय, स्वारगेट, पुणे | 13000 | 2000 | 15000 | |
| 8 | तालुका स्तरीय न्यायालय (आंबेगांव / बारामती / भोर / दौंड / इंदापूर / जुन्नर / खेड / मावळ / पुरंदर / शिरुर ) (प्रत्येकी स्थानिक 2) | 13000 | 2000 | 15000 | |
| 9 | मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर बारामती, राजगुरुनगर व मावळ (प्रत्येकी 1) | 13000 | 2000 | 15000 | |
| 10 | कायदेविषयक अभिप्राय देणे | 3000 | -- | 3000 | कार्यवाही |

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | कायदेशीर नोटीस देणे अथवा नोटीशीस उत्तर देणे | 5000 | 500 | 5500 | नंतर अदा करणे |
| 12 | जिल्हा न्यायालय / कामगार-औद्योगिक न्यायालय येथे कॅव्हिएट दाखल करणे | 5000 | -- | 5000 | |
| 13 | मा. उच्च न्यायालय, मुंबई / औरंगाबाद / नागपूर खंडपीठ येथे कॅव्हिएट दाखल करणे | 5000 | 2000 | 7000 | |
| 14 | रिट याचिकेचे परिच्छेदनिहाय उत्तर तयार करुन देणे | 5000 | -- | 5000 | |

**<u>वकिल फि अदा करणेच्या संदर्भातील अनुषंगिक बाबी पुढील प्रमाणे राहतील :-</u>**

1. वकिल फी व खर्चाच्या रक्कमा वरील तक्त्यात संबंधित बाबीसमोर नमूद केल्याप्रमाणे अदा करण्यांत येतील. वकीलपत्र दाखल करुन जिल्हा परिषदेच्या वतीने लेखी म्हणणे / शपथपत्र / प्रतिज्ञापत्र / परिच्छेदनिहाय अभिप्राय दाखल केल्यानंतर प्रथम 50% व अंतीम निकाल झालेनंतर निकालाची प्रमाणित सत्यप्रत (सर्टिफाईड कॉपी) सादर केल्यानंतर ऊर्वरित 50% फी अदा करण्यांत येईल.
2. दावा दाखल झालेल्या सुरुवातीच्या काळात पक्षकाराने दावा काढून घेतल्यास जिल्हा परिषदेच्या वकीलांना 50 टक्केच फी देय राहील. परंतू वादीने दाव्याच्या शेवटच्या स्टेज पर्यंत दावा काढून घेतल्यांस जिल्हा परिषदेच्या वकिलांना पूर्ण 100% फी अदा करण्यांत येईल. दावा निकाली झाल्यानंतर दाव्याची प्रमाणित सत्यप्रत देण्याची जबाबदारी पॅनल वरील वकिलांची राहीलं.
3. उपरोक्त नमूद अनुज्ञेय खर्चामध्ये न्यायालयात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व वकिलांनी कोर्टात सादर करावयाचे अर्जाचे टायपिंग, निकालाची प्रमाणित सत्यप्रत उपलब्ध करुन देणे इ. खर्चाचा समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने रिट याचिका, दावा किंवा अपील दाखल करताना कोर्ट फी भरावी लागत असल्यांस ती अतिरिक्त देय राहीलं.
4. सुपूर्द केलेल्या प्रकरणांनुसार काही वेळा वकिलांना कार्यक्षेत्रा बाहेरील कोर्टात उपस्थित राहून कामकाज करावे लागते अशा प्रकरणी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता वकिल फी व्यतिरिक्त देय राहीलं. सदर भत्ता जिल्हा परिषदेच्या वर्ग-2 अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने अदा करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी त्यांना नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्राबाहेर न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहणेबाबत संबंधित खातेप्रमुखांची लेखी पूर्व संमती घेणे आवश्यक राहीलं.
5. जिल्हा परिषदेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील न्यायालयीन दाव्यांमध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरणपरत्वे वाढ करण्याचे अधिकार मा. स्थायी समितीस राहतील. पॅनल मधील विशिष्ट वकील अथवा पॅनल व्यतिरिक्त विधीज्ञांची (वकिलांची) नियुक्ती करण्याचा व त्यांची फी ठरविण्याचा अधिकार मा. स्थायी समितीला राहील.
6. कोणत्या वकिलास कोणते व किती दावे द्यायचे याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असून या संदर्भात सर्व वकिलांना समसमान पध्दतीने अथवा विशिष्ठ विभागाचे दावे विशिष्ठ

Scanned with CamScanner

वकिलांकडे देणे अथवा विशिष्ठ स्वरुपाचे दावे विशिष्ठ वकिलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

**<u>ॲडव्होकेट पॅनल वर नियुक्त वकिलांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या</u> :-**

1. पुणे जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबींबाबत तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. जिल्हा परिषद हिताचे संवर्धन होईल यादृष्टीने प्रशासकिय बाबींची माहिती घेऊन तसेच आवश्यक तो कायद्याचा आधार घेऊन जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण क्षेमतेने व प्रभावीपणे न्यायालयात मांडणे.
3. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी / महसूल विषयक प्रकरणे तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती बाबत सर्व प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
4. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्याच्या दृष्टीने सरकारी वकिलांकडे पाठपुरावा (जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी) व संबंधित अधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन आवश्यक ते प्रतिज्ञापत्र / शपथपत्र तयार करणे.
5. जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीकोनातून न्यायालयीन प्रकरणांबाबत व कायदेशीर मार्गदर्शनाबाबत आवश्यक ती गोपनियता बाळगणे.
6. जिल्हा परिषद पॅनल वर नियुक्त करण्यात आलेल्या वकिलांना जेथे जिल्हा परिषद वादी / प्रतिवादी असेल अशा न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदेच्या विरोधात वकिलपत्र स्विकारता येणार नाही. अशा स्वरुपाची बाब निदर्शनांस आल्यांस जिल्हा परिषद पॅनल वरील नेमणूक संपुष्टात आणणेची कार्यवाही केली जाईल.
7. ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या विरोधी निकाल झालेले असतील अशा प्रकरणांमध्ये न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करुन गुणवत्तेनुसार वरिष्ठ न्यायालयाकडे अपिल दाखल करणे संदर्भात कायदेशीर मार्गदर्शन करणे.
8. पॅनलवरील एखादा वकिल त्यांचेकडे सोपविलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या बाबतीत जिल्हा परिषदेची बाजू पुरेशा प्रभावाने मे. न्यायालयामध्ये मांडत नसल्याची बाब निदर्शनास आल्यांस त्यांचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रदद करण्यात येऊन त्यांची पॅनल वरील नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल.
9. पॅनल नियुक्त करण्यात आलेल्या वकिलांना न्यायालयीन दाव्याच्या संदर्भातील विषय, सदर विषयाच्या कामकाजातील नैपुण्यता इ. बाबींचा विचार करुन दावे सुपूर्द केले जातील.
10. जिल्हा परिषद स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या न्यायालयीन दाव्यांच्या आढावा संदर्भातील सभांना उपस्थित राहून त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या दाव्यांच्या सद्यःस्थितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहिल.
11. न्यायालयीन प्रकरणा संदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसाच्या आंत प्रत्येक सुनावणीनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

**<u>अर्जदारांना सर्वसाधारण सुचना</u> :-**

1) ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म दवारे करावयाच्या अर्जाचा नमुना पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्या **<u>www.zppune.org</u>** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

2) ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म दवारे करावयाच्या अर्जाच्या नमुन्यामध्ये परिपूर्ण अर्ज दिनांक 22/09/2022 रोजी पर्यंत भरणे आवश्यक असून योग्य त्या ठिकाणी कागदपत्र अपलोड करणे गरजेचे आहे. मुदती नंतर भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

3) सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, पिनकोड नंबर, भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. विषयक माहिती आवश्यक त्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

**( आयुष प्रसाद – भा.प्र.से. )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**तथा प्रशासक**
**पुण जिल्हा परिषद, पुणे**

Scanned with CamScanner